01 FEB 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाला ग्रीन चॅम्पियन पुरस्कार

## चेअरमन डॉ. डब्ल्यू. जी. प्रसन्नकुमार यांची माहिती : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषदेतर्फे स्पर्धा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

केंद्रीय उच्च शिक्षण मंत्रालयांत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ सन २०२१-२२ साठी 'कोल्हापूर जिल्हा ग्रीन चँपियन' पुरस्काराचे मानकरी ठरले आहे., अशी माहिती परिषदेचे चेअरमन डॉ. डब्ल्यू. जी. प्रसन्न कुमार यांनी ई-मेलद्वारे विद्यापीठ प्रशासनाला दिली.

केंद्र सरकारच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषदेमार्फत दर वर्षी स्वच्छ कॅम्पस इन्स्टिट्यूशनल पुरस्कार प्रदान केला जातो. जिल्हा स्तरापासून ते केंद्रीय स्तरापर्यंत विविध शैक्षणिक संस्थांच्या परिसराची स्वच्छता आणि हरितपणा या मूलभूत निकषांवर ही निवड केली जाते. शिवाजी विद्यापीठाने यंदा प्रथमच या स्पर्धेत सहभाग नोंदवून जलव्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात केलेल्या कार्यावर जिल्हा स्तरावर प्रथम पुरस्कार मिळवला. निकषांमध्ये जल व्यवस्थापन, सौर ऊर्जा वापर व ऊर्जा संवर्धन उपक्रम, हरितक्षेत्र व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन आणि भू-वापर व व्यवस्थापन यांचा समावेश आहे.



- हरित, जलसमृध्द, जैवविविधता संपन्न शिवाजी विद्यापीठ
- ई मेलद्वारे विद्यापीठ प्रशासनाला माहिती
- जिल्हा ते केंद्रीय स्तरावरील मूलभूत निकषांवर निवड

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, विद्यापीठ जल व्यवस्थापनात स्वयंपूर्ण आहे. दरवर्षी साधारण ३१ कोटी लीटर पाण्याचे संवर्धन करते. त्याचबरोबर दररोज ४ लाख लीटर सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करून ते उद्यानांसाठी वापरले जाते. सौरऊर्जेचा वापरही विद्यापीठ टप्प्याटप्प्याने वाढवित आहे. सध्या एकूण वीज वापरापैकी १६ टक्के वीज ही सौरऊर्जेपासून मिळविली जाते. विद्यापीठाने आपल्या ८५३ एकर क्षेत्रावर वृक्ष लागवड केली आहे. विद्यापीठ परिसरात विविध प्रजातींची १३ हजारांहून अधिक वृक्ष आहेत. यामुळे हा परिसर कोल्हापूर नगरीचे फुप्फुस म्हणून ओळखला जातो. गतवर्षी विद्यापीठाने १२०० रोपांची लागवड केली आहे. मियावाकी जंगल क्षेत्र विकसित करण्याचा प्रकल्प राबविते. दररोज सरासरी ५७५ किलो घनकचऱ्याचे व्यवस्थापन यशस्वीरित्या करते. पर्यावरण संवर्धनासाठी हरित विकास हा मूलमंत्र घेऊन विद्यापीठ वाटचाल करत असल्याचे डॉ. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

### 'ग्रीन प्रॅक्टीसेस'मध्ये सर्वच घटकांचे योगदान मोलाचे



शिवाजी विद्यापीठाने जलसंवर्धनासह पर्यावरणपूरक संवर्धनशील हरित विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. विद्यापीठाचा अभियांत्रिकी व उद्यान विभाग देत असलेले योगदान लक्षणीय आहे. परिसराच्या स्वच्छतेसह ग्रीन प्रॅक्टीसेस राबविण्याबाबत कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी आणि फिरायला येणारे नागरिक सजग आणि दक्ष आहेत. विद्यापीठ परिसराची हिरवाई आणि प्रेक्षणीयता अबाधित आहे.

**कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के** (शिवाजी विद्यापीठ)

0 1 FEB 2022

**पुढारी**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ 'जिल्हा ग्रीन चॅम्पियन'

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषदेतर्फे स्पर्धा; पहिल्यांदाच सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय उच्च शिक्षण मंत्रालयांतर्गत असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ २०२१-२२ साठी 'कोल्हापूर जिल्हा ग्रीन चॅम्पियन' पुरस्काराचे मानकरी ठरले आहे. विद्यापीठाने या स्पर्धेत यंदा पहिल्यांदाच सहभाग घेतला होता. या पुरस्काराने कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

जिल्हा ते केंद्रीय स्तरापर्यंत विविध शैक्षणिक संस्थांच्या परिसराची स्वच्छता व हरितपणा या निकषांवर निवड केली जाते. पुरस्काराच्या निकषांत जलव्यवस्थापन, सौरऊर्जा वापर व ऊर्जा संवर्धन उपक्रम, हरितक्षेत्र व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन आणि भू-वापर व व्यवस्थापन यांचा समावेश होता.



हरित शिवाजी विद्यापीठ परिसर

गेल्या काही वर्षांत जलव्यवस्थापन व पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील कामगिरीच्या जोरावर जिल्हा स्तरावर प्रथम पुरस्कार मिळवला आहे. ही माहिती परिषदेचे चेअरमन डॉ. डब्ल्यू. जी. प्रसन्न कुमार यांनी विद्यापीठ प्रशासनास दिली आहे.

शिवाजी विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत राबवलेल्या जलव्यवस्थापन अभियानामुळे परिसर पाणी वापरात स्वयंपूर्ण झाला आहे. विद्यापीठ साधारण ३१ कोटी लिटर पाण्याचे संवर्धन करते. दररोज ४ लाख लिटर सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करून ते उद्यानांसाठी वापरले जाते. सध्या वीज वापरापैकी १६ टक्के वीज सौरऊर्जेपासून मिळवली जाते. विद्यापीठाने ८५३ एकर क्षेत्रावर वृक्ष लागवड केली आहे. विद्यापीठ परिसरात विविध प्रजातींची १३ हजारांहून अधिक वृक्ष आहेत. हा परिसर कोल्हापूरचे फुफ्फुस म्हणून ओळखला जातो.

मियावाकी जंगल क्षेत्र विकसित करण्याचा प्रकल्प विद्यापीठ राबवत आहे. नव्या तंत्राचा वापर केल्याने विद्यापीठाला यश मिळाल्याचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले.

### 'ग्रीन प्रॅक्टिसेस'मध्ये सर्वच घटकांचे योगदान मोलाचे : कुलगुरू

शिवाजी विद्यापीठाने जलसंवर्धनासह पर्यावरणपूरक संवर्धनशील हरित विकासावर लक्ष केंद्रीत केले आहे. यात अभियांत्रिकी व उद्यान विभाग देत असलेले योगदान लक्षणीय आहे. सर्वांमुळेच विद्यापीठ परिसराची हिरवाई व प्रेक्षणीयता अबाधित आहे. पुढील काळात असेच काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

01 FEB 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

राष्ट्रीय शिक्षण परिषदेकडून पुरस्कार : परिसराची स्वच्छता, हरितपणाच्या जोरावर यश

# शिवाजी विद्यापीठ ठरले 'ग्रीन चॅम्पियन'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ हे केंद्र सरकारच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषदेच्या यावर्षीच्या 'कोल्हापूर जिल्हा ग्रीन चॅम्पियन' पुरस्काराचे मानकरी ठरले आहे. त्याची माहिती या परिषदेचे अध्यक्ष डॉ. डब्ल्यू. जी. प्रसन्न कुमार यांनी ई-मेलद्वारे विद्यापीठ प्रशासनाला सोमवारी दिली.

या परिषदेमार्फत दरवर्षी स्वच्छ कॅम्पस इन्स्टिट्यूशनल पुरस्कार प्रदान केले जातात. याअंतर्गत जिल्हा स्तरापासून ते केंद्रीय स्तरापर्यंत विविध शैक्षणिक संस्थांच्या परिसराची स्वच्छता आणि हरितपणा या मूलभूत निकषांवर निवड करून त्यांना पुरस्कार प्रदान करून प्रोत्साहित करण्यात येते.

> शिवाजी विद्यापीठाने जलसंवर्धनासह पर्यावरणपूरक संवर्धनशील हरित विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. यामध्ये विद्यापीठाचा अभियांत्रिकी व उद्यान विभाग देत असलेले योगदान लक्षणीय आहे. परिसराच्या स्वच्छतेसह ग्रीन प्रॅक्टिसेस राबविण्याबाबत कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी, नागरिक हे सर्वच घटक सजग आहेत. -डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

शिवाजी विद्यापीठाने यावर्षी प्रथमच या स्पर्धेत सहभाग नोंदविला आणि गेल्या काही वर्षांत जलव्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात केलेल्या कामाच्या बळावर जिल्हा स्तरावर प्रथम पुरस्कार प्राप्त केला.

**निकष असे** या पुरस्कारासाठीच्या प्रमुख निकषांमध्ये जल व्यवस्थापन, सौरऊर्जा वापर, ऊर्जा संवर्धन उपक्रम, हरितक्षेत्र, घनकचरा, भू-वापर आणि व्यवस्थापनाचा समावेश होता.



दरम्यान, विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत राबविलेल्या जल व्यवस्थापन अभियानामुळे विद्यापीठ परिसर पाणी वापराच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. दर मोसमात विद्यापीठ साधारण ३१ कोटी लिटर पाण्याचे संवर्धन करते. त्याचबरोबर दररोज चार लाख लिटर सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करून ते उद्यानांसाठी वापरले जाते. एकूण वीज वापरापैकी १६ टक्के वीज ही सौरऊर्जेपासून मिळविली जाते.

विद्यापीठाने आपल्या ८५३ एकर क्षेत्रावर वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात केली आहे. विद्यापीठ रोज सरासरी ५७५ किलो घनकचऱ्याचे व्यवस्थापन करते. पर्यावरण संवर्धनासाठी हरित विकास हा मूलमंत्र घेऊन विद्यापीठ वाटचाल करीत असून, त्या बळावरच विद्यापीठाला हे यश मिळाले असल्याचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

01 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# विद्यापीठ देशात भारी

## केंद्रीय उच्च शिक्षण मंत्रालयांतर्गत 'कोल्हापूर जिल्हा ग्रीन चॅम्पियन' पुरस्कार

कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठ २०२१-२२ साठीच्या कोल्हापूर जिल्हा ग्रीन चॅम्पियन' पुरस्काराचे मानकरी ठरले आहे. केंद्रीय उच्च शिक्षण मंत्रालयांतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषदेतर्फे घेतलेल्या स्पर्धेत हा मान मिळाला. त्याची माहिती परिषदेचे चेअरमन डॉ. डब्ल्यू. जी. प्रसन्नकुमार यांनी ई-मेलद्वारे विद्यापीठ प्रशासनाला दिली.

केंद्र सरकारच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषदेमार्फत दरवर्षी स्वच्छ कॅम्पस् इन्स्टिट्यूशनल पुरस्कार देण्यात येतात. याअंतर्गत जिल्हा ते केंद्रीय स्तरापर्यंत विविध शैक्षणिक संस्थांच्या परिसराची स्वच्छता व हरितपणा या मूलभूत निकषांवर निवड करून त्यांना पुरस्कार प्रदान करून प्रोत्साहित करण्यात येते. विद्यापीठाने यंदा प्रथमच स्पर्धेत सहभाग नोंदविला. जल व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात केलेल्या कामाच्या बळावर जिल्हा स्तरावर प्रथम पुरस्कार मिळवला.



कोल्हापूर : हिरवाईने नटलेला शिवाजी विद्यापीठाचा परिसर

निकषांत जल व्यवस्थापन, सौरऊर्जा व ऊर्जा संवर्धन उपक्रम, हरितक्षेत्र व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन आणि भू-वापर व व्यवस्थापन यांचा समावेश होता.

> विद्यापीठाने जल संवर्धनासह पर्यावरणपूरक संवर्धनशील हरित विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. विद्यापीठाचा अभियांत्रिकी व उद्यान विभाग देत असलेले योगदान लक्षणीय आहे. त्याचबरोबर परिसराच्या स्वच्छतेसह ग्रीन प्रॅक्टिसेस राबविण्याच्या बाबतीत येथे येणारे कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी आणि फिरावयास येणारे नागरिक हे सर्वच घटक अत्यंत सजग आणि दक्ष आहेत. त्यांच्यामुळे विद्यापीठ परिसराची हिरवाई आणि प्रेक्षणीयता अबाधित आहे.
>
> - डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, 'दर मोसमात विद्यापीठ साधारण ३१ कोटी लिटर पाण्याचे संवर्धन करते. त्याचबरोबर दररोज ४ लाख लिटर सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करून ते उद्यानांसाठी वापरले जाते. सध्या एकूण वीज वापरापैकी १६ टक्के वीज सौरऊर्जेपासून मिळविली जाते. ८५३ एकरात वृक्ष लागवड केली असून, परिसरात विविध प्रजातींचे १३ हजारांहून अधिक वृक्ष आहेत. गतवर्षी विद्यापीठाने १२०० रोपांची लागवड केली आहे. मियावाकी जंगल क्षेत्र विकसित करण्याचा प्रकल्प राबविते आहे. दररोज सरासरी ५७५ किलो घनकचऱ्याचे व्यवस्थापन करते.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 FEB 2022 लोकमत

# जग बदलण्यासाठी तंत्रज्ञानाचे विनाशक स्वरूप समजून घ्यावे

## कुमार केतकर : शिवाजी विद्यापीठात परिसंवादाचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : उजव्या शक्तीच्या जागतिकीकरणाशी केंद्रीय-डाव्या शक्तींच्या जागतिकीकरणाचा संघर्ष आहे. आपल्याला मोठी जागतिक लढाई लढावी लागणार आहे. जग बदलायचे असल्यास आधी तंत्रज्ञानाचे विनाशक स्वरूप, विशेषतः शिक्षित मध्यमवर्गावरील प्रभाव समजून घ्यावा लागेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी केले.



शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व मराठी अधिविभाग व द इंटरनॅशनल सेंटर फॉर साउथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज, मॉस्को यांच्या संयुक्त विद्यमाने 'दक्षिण आशिया : 'अज्ञात' अवकाशांचा शोध' अंतर्गत 'दक्षिण आशिया : समकालीन गतिमान वास्तव' या विषयावरील आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय ऑनलाइन परिसंवादाच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी 'दक्षिण आशियातील अनिश्चिततेचे पिशाच्च' या विषयावर मांडणी केली.

या परिसंवादात डॉ. इंदिरा गजीयेवा यांनी हिंदीतून भावना व्यक्त केल्या. डॉ. मेघा पानसरे, प्रा. अलेक्सांद्र स्तलिरोव, अरुंधती पवार, प्रा. नंदकुमार मोरे उपस्थित होते. प्रा. रणधीर शिंदे यांनी आभार मानले.

### 'राजकीय स्थिती, कट्टरतावादाचा उदय'वर मांडणी

परिसंवादातील पहिल्या सत्रात 'सद्य दक्षिण आशिया : एक झलक' या सत्रात नेपाळचे लेखक प्रा. महेंद्र लावोटी यांनी तेथील राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला. पाकिस्तानमधील मार्क्सवादी अभ्यासक डॉ. तैमुर रहमान यांनी 'पाकिस्तानमधील बरेलवी कट्टरतावादाचा उदय' विषयावर मांडणी केली. बांगलादेशातील स्त्रीवादी खुशी कबीर यांनी 'दक्षिण आशियातील समावेशक संस्कृतीचे सार' विषयावर, तर ॲड. निमाल्का फर्नान्दो यांनी 'श्रीलंका व दक्षिण आशिया डावपेचात्मकदृष्ट्या चिंतेचे विषय' विषयावर मांडणी केली. एस. इरुदया राजन, केरळ यांनी 'दक्षिण आशियातील स्थलांतराचा प्रश्न' विषयावर, प्रताप आसबे यांनी 'काश्मीरमधील अलीकडील घडामोडी', तर विनीत तिवारी यांनी 'चीनचा दक्षिण आशियातील देशांवर प्रभाव' या विषयावर मांडणी केली.

01 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनेक देशांत कट्टरतावाद वाढीस : कुमार केतकर

## » आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिसंवाद

कोल्हापूर, ता. ३१ : संघर्षाचा नवा इतिहास पुन्हा निर्माण केला जात असून, जगातील अनेक देशांत धार्मिक कट्टरतावाद वाढत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग, मराठी विभाग आणि रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'दक्षिण आशिया : 'अज्ञात' अवकाशांचा शोध' अंतर्गत 'दक्षिण आशिया : समकालीन गतिमान वास्तव – २०२२' विषयावरील आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिसंवादाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

श्री. केतकर म्हणाले, "१९९१ मध्ये सोविएत युनियनच्या विघटनानंतर जगातील सत्तासंतुलन बदलले. जे जे २० व्या शतकाने एकत्र जोडून निर्माण केले होते, त्याच्या अंताने त्या शतकाची अखेर झाली. २१ व्या शतकात नवीन तंत्रज्ञानाच्या प्रसाराने अभूतपूर्व स्थिती निर्माण झाली. गुगल कंपनीसारखी अत्यंत वेगळ्या प्रकारची भांडवलदारी मक्तेदारी अस्तित्वात आली.."

ते म्हणाले, "वाजपेयींच्या काळातील हिंदुत्व आणि आजचे हिंदुत्व यांत फरक आहे. आज धर्म संसद भरवून मुस्लिमांची कत्तल करण्याची घोषणा होते. त्यांचे समूळ निर्मूलन करण्याची घोषणा होते. ज्या नेहरूवादी धोरणांचे लाभ घेऊन मध्यम वर्गाची प्रगती झाली तो शिक्षित मध्यमवर्ग कट्टरतावादाचा पुरस्कर्ता आहे. स्वातंत्र्याच्या वेळी एक टक्का असलेला मध्यमवर्ग आज ४० टक्के आहे. त्यातील मोठ्या संख्येने अमेरिकेसारख्या देशांत स्थलांतरित झालेला असून तो देशीय स्तरावर हिंदुत्वाचा पुरस्कार करतो आहे. तेव्हा हा उपभोक्तावादी, संवेदनाहीन मध्यमवर्ग आज प्रबळ आहे. तो कॉर्पोरेट भांडवलदारी क्षेत्राचा बळी आहे."

डॉ. इंदिरा गजीयेवा यांनी हिंदीमधून परिसंवादाबाबत भावना व्यक्त केल्या. डॉ. मेघा पानसरे, प्रा. अलेक्सांद्र स्तलिरोव, अरुंधती पवार, प्रा. नंदकुमार मोरे उपस्थित होते. प्रा. रणधीर शिंदे यांनी आभार मानले.

### तज्ज्ञांचे मार्गदर्शन

'सद्य दक्षिण आशिया : एक झलक' या सत्रात प्रथम नेपाळचे लेखक व अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील प्रा. महेंद्र लावोटी, पाकिस्तानमधील युवा कलावंत व मार्क्सवादी अभ्यासक डॉ. तैमुर रहमान, बांग्लादेशातील स्त्रीवादी खुशी कबीर यांनी 'दक्षिण आशियातील समावेशक संस्कृतीचे सार', तर ॲड. निमाल्का फर्नान्दो यांनी 'श्रीलंका आणि दक्षिण आशिया डावपेचात्मकदृष्ट्या चिंतेचे विषय' विषयावर मांडणी केली. 'दक्षिण आशियातील मानवी हक्क व लोकशाही' सत्रात एस. इरुदया राजन यांनी 'दक्षिण आशियातील स्थलांतराचा प्रश्न', प्रताप आसबे यांनी 'काश्मीरमधील अलीकडील घडामोडी', तर विनीत तिवारी यांनी 'चीनचा दक्षिण आशियातील देशांवर प्रभाव' विषयावर मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 FEB 2022

लोकमत

# विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षांसाठी सज्ज राहावे

## उदय सामंत : राज्यातील महाविद्यालये आजपासून सुरू होणार; १५ फेब्रुवारीपर्यंतच्या परीक्षा ऑनलाईनच

लोकमत न्यूज नेटवर्क

कऱ्हाड : 'कोरोनाच्या संकटामुळे ऑनलाईन शिक्षण व ऑनलाईन परीक्षेचा निर्णय घ्यावा लागला. आता १ फेब्रुवारीपासून राज्यातील महाविद्यालये आपण प्रत्यक्ष सुरू करीत आहोत. १५ फेब्रुवारीपर्यंतच्या परीक्षा ऑनलाईनच होणार आहेत; पण त्यानंतर विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षेसाठी सज्ज राहावे.' असे आवाहन राज्याचे तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केले.

कऱ्हाड येथील शासकीय अभियांत्रिकी, फार्मसी महाविद्यालयात सोमवारी मंत्री सामंत यांनी आढावा बैठक घेतली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. मंत्री सामंत म्हणाले, 'शैक्षणिक गुणवत्ता टिकवण्यासाठी ऑफलाईन शिक्षणाची गरज आहे. पण कोरोनाच्या संकटामुळे ऑनलाईनचा नाईलाजाने आधार घ्यावा लागला. आता १ फेब्रुवारीपासून राज्यातील महाविद्यालये पूर्ववत सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. तरीदेखील स्थानिक परिस्थिती पाहून जिल्हाधिकारी काही निर्णय घेऊ शकतात. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयांमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. मात्र, त्यामुळे विद्यार्थी वर्गाबाहेर राहू नयेत म्हणून लसीकरणाचे शिबिर महाविद्यालयात राबवण्यात येणार आहेत, असेही मंत्री सामंत यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. त्याचबरोबर महाविद्यालयातील प्राचार्यांना खर्च करताना मर्यादा होत्या. त्या मर्यादाही वाढविण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. तो निर्णय राज्यभरासाठी असल्याचे त्यांनी सांगितले.



### तक्रार आली, तर कारवाई करणार...

तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमध्येही बोगस पदव्या दिल्या जात असल्याचे मत काही शिक्षणतज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. याकडे मंत्री सामंत यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले की, तशा प्रकारची पुराव्यासह लेखी तक्रार माझ्याकडे कोणी दिली तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

### कऱ्हाड महाविद्यालयासाठी निर्णय..

पुढील शैक्षणिक वर्षापासून कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग हा अभ्यासक्रम सुरू करणार. कऱ्हाड येथे इनोवेशन सेंटरचा ३१ मार्चपर्यंत प्रस्ताव मागवण्यात आला आहे. त्याला तातडीने मंजुरी देऊन ५ कोटींचा निधी देणार. शासकीय महाविद्यालयात काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचारी व शिपाई यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे १ एप्रिलपासून पगार देण्यात येणार. मागासवर्गीय समाजातील मुलींच्या वसतिगृहासाठी १ कोटींचा निधी देणार, आदी निर्णय मंत्री सामंत यांनी यावेळी जाहीर केले.

पुढारी

# २७६ महाविद्यालये आजपासून होणार सुरू

- लसीचे दोन डोस पूर्ण असणे गरजेचे
- वसतिगृह टप्प्याटप्प्याने सुरू होणार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये, अधिविभागांमधील ऑफलाईन वर्ग मंगळवारपासून (दि. १) सुरू होणार आहेत. लसीचे दोन डोस पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना परवानगी असणार आहे.

विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये, शिक्षण संस्थांमधील नियमित वर्ग सुरू करण्याबाबत विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे महाविद्यालये व अधिविभागांना कळवले आहे. विद्यापीठाकडून तयारी पूर्ण झाली आहे. २७६ महाविद्यालये व ४१ अधिविभाग असून त्यामध्ये २ लाख ६० हजारांहून अधिक विद्यार्थी संख्या आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासन व यूजीसीच्या नियमावलीचे पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दोन्ही डोस न घेतलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

नियमित वर्ग ऑफलाईन पद्धतीने सुरू करण्यासाठी महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांची संमती घेण्याची सूचना दिली आहे. विद्यापीठ, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत स्थानिक पातळीवर निर्णय घेण्यात यावा, अशा सूचना कुलसचिवांनी दिल्या आहेत. उच्च शिक्षण विभागाच्या आदेशानुसार टप्प्याटप्प्याने विद्यापीठ परिसरातील दहा वसतिगृहे सुरू केली जाणार आहेत.

तरुण भारत

# महाविद्यालये, अधिविभाग आजपासून सुरू



कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासन निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये १ फेब्रुवारी आजपासून सुरू होणार आहेत. लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश द्यावयाचा आहे. त्यामुळे आजपासून पुन्हा विद्यापीठ व महाविद्यालयांचा कॅम्पस फुलणार आहे. प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. विद्यापीठाने परिपत्रक काढून महाविद्यालये व अधिविभागांना वर्ग सुरू करण्यासंदर्भात सूचना केल्या आहेत. कोरोनाचा स्थानिक पातळीवरील निर्णय घेवून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उपस्थितीबाबत निर्णय घ्यावा. त्याचा अहवाल महाविद्यालयांनी विद्यापीठातील संलग्नता विभागास व विद्यापीठातील अधिविभाग व प्रशासकीय विभागांनी आस्थापनाला द्यावा, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाने दिल्या आहेत. त्यामुळे नियमांचे पालन करीत आजपासून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २७६ महाविद्यालये सुरू होणार आहेत. यात २ लाख ६० हजार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दोन्ही डोस न घेतलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून द्यावी. नियमित वर्ग ऑफलाईन पद्धतीने सुरू करण्यासाठी महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांची संमती घेणे आवश्यक आहे.

01 FEB 2022 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयांमध्ये लशीचे २ डोस घेतलेल्यांनाच प्रवेश

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांची माहिती

**लोकसत्ता वार्ताहर**

**कराड** : विध्यार्थ्यांचे आठवड्याभरात शंभर टक्के लसीकरण होण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. करोना प्रतिबंधक लशीचे दोन डोस घेतलेल्या विध्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश राहणार आहे. तर, लस न घेतलेल्या विध्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण दिले जाईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

सामंत म्हणाले, की उद्या एक फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू करण्यात येत आहेत. पण, लशीचे दोन डोस घेणाऱ्या विध्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश राहणार असल्यानेच या विध्यार्थ्यांच्या शंभर टक्के लसीकरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घ्यायचे आहेत. याबाबतचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असून, त्यांनी गतीने लसीकरण होण्यासाठी शिबिरे घ्यावीत. ठोसकृती करावी असे निर्देश मंत्री सामंत यांनी दिले. खासगी महाविध्यालयांसाठीही विध्यार्थ्यांच्या शंभर टक्के लसीकरणाची सक्ती राहणार आहे. राज्यातील करोनाचा आढावा व कुलगुरुंशी बोलून १५ फेब्रुवारीनंतर पुढील परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन घ्यायच्या याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले. राज्यातील तंत्रनिकेतन महाविद्यालयांचे प्राचार्य, जॉइंट डायरेक्टर, डायरेक्टर यांना खर्च करण्याची मर्यादा वाढवून देण्यात आली आहे. महाविद्यालयांमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतनात वाढ देण्यात आल्याचे सामंत म्हणाले.

विधानसभेतील गैरवर्तनप्रकरणी भाजपाच्या १२ आमदारांचे निलंबन सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवले. तसाच न्याय राज्यपाल नियुक्त आमदारांसंदर्भातही व्हायला हवा अशी आपली व्यक्तीगत भावना आहे. आमदार नियुक्तीचा हा मुद्दा घेऊन आपण न्यायालयात जाण्याचा विचार करीत असून, त्याबाबत उद्या मुंबईत कायदेतज्ज्ञांशी सल्लामसलत करून निर्णय घेणार आहे. त्यात राज्यपालांचा अनादर करण्याचा हेतू नसून भाजपाच्या निलंबित आमदारांना न्यायालयाचा जसा दिलासा मिळतो तसाच तो राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्यांच्या प्रलंबित प्रकरणातही मिळायला हवा अशी आपली व्यक्तीगत भावना असल्याचे उदय सामंत यांनी सांगितले.

पुढारी

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे प्रा. योगेश बोराटे यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाचे पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन व तिटवे (ता. राधानगरी) येथील शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंज्ञापन विभागातील सहायक प्रा. योगेश बोराटे यांचे सोशल 'मीडियाची आजादी : किती खरी, किती खोटी' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन केले आहे.

मंगळवार, दि. १ फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजता गुगल मिटद्वारे व्याख्यान होईल. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत व्याख्यान होणार आहे. विद्यार्थी, संशोधक व पत्रकारांनी व्याख्यान ऑनलाईन जॉईन करावे, असे आवाहन पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

लोकमत

# पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा आजपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांमधील पदवी प्रथम वर्षाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ मंगळवारपासून होणार आहे. ऑनलाइन स्वरूपात परीक्षा होईल. विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्षातील पहिले सत्र दि. २४ जानेवारीला संपले असून, महाविद्यालयांना सुटी सुरू झाली आहे. त्यातच विद्यापीठ प्रशासनाने शासन आदेशानुसार ऑफलाइन वर्ग सुरू करण्याचे पत्र पाठविल्याने महाविद्यालयांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. बहुतांश महाविद्यालयांनी दि. २ मार्चपासून वर्ग सुरू करण्याचे ठरविले आहे. विद्यापीठाने दि. २५ जानेवारीपासून परीक्षा घेण्याची सूचना महाविद्यालयांना गेल्या महिन्यात केली होती. मात्र, अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतरच परीक्षा घेण्याचे महाविद्यालयांनी ठरविले. त्यानुसार मंगळवार, १ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारीदरम्यान महाविद्यालयांकडून पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत.

01 FEB 2022

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणाची रचना

## यूजीसीकडून मसुदा जाहीर, हरकती-सूचनांसाठी १५ फेब्रुवारीची मुदत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** नव्या शैक्षणिक धोरणानुसार देशभरातील विद्यापीठांतील अभ्यासक्रमाची नवी रचना करण्यात आली आहे. त्यात पारंपरिक तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रमासह चार वर्षांचा ऑनर्स पदवी अभ्यासक्रम, चार वर्षांच्या पदवीनंतर एक वर्षाचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम, संशोधनासह चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमानंतर पीएच.डी. आदींचा समावेश असलेल्या राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखड्याचा मसुदा विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) जाहीर केला असून, त्यावर १५ फेब्रुवारीपर्यंत हरकती सूचना नोंदवता येतील.

नव्या शैक्षणिक धोरणात बदलत्या काळानुरूप देशातील शिक्षण प्रक्रियेत काही बदल करण्यात आले आहेत. पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षण अशा सर्वच स्तरांवर काही बदल करण्यात आले आहेत. विशेषतः उच्च शिक्षणामध्ये लवचिकतेवर, विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासावर, ज्ञानाधिष्ठित शिक्षणावर भर देण्यात आला आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येणाऱ्या नवे शैक्षणिक धोरणात राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा तयार करण्याची तरतूद होती. या पार्श्वभूमीवर यूजीसीने पदवी अभ्यासक्रमातील बदलांसंदर्भातील आराखड्याचा मसुदा संकेतस्थळावर जाहीर केला आहे.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणात होऊ घातलेल्या बदलांची आणि त्याच्या अंमलबजावणीची माहिती या आराखड्याच्या मसुद्यात देण्यात आली आहे. उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांना कोणत्याही टप्प्यावर शिक्षण सोडण्याची आणि परत येण्याची मुभा देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे विषय श्रेयांक घेऊन शिकता येतील. अभियांत्रिकी पदवीचे नाव बीटेक असे असेल. देशात पदवीधर विद्यार्थ्यांमध्ये समानता असण्यासाठी प्रत्येक पदवीसाठी किमान कौशल्ये निश्चित करण्यात आली आहेत. तसेच किमान कौशल्यांपेक्षा जास्तीची कौशल्ये विद्यार्थ्यांना शिकवण्याचा अधिकार विद्यापीठांना देण्यात आला आहे. पदवी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक आणि संशोधक वृत्ती निर्माण करणे, विद्यार्थ्यांमध्ये बहुकौशल्ये निर्माण करणे, ज्ञानाचा वापर करणे, विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करणे यावर या आराखड्यात भर देण्यात आला आहे.

### अभ्यासक्रम आणि श्रेयांकांची रचना



नव्या धोरणानुसार पदवी ते पीएच.डी. अभ्यासक्रमासाठीच्या श्रेयांकांची रचना करण्यात आली आहे. पाचव्या स्तरासाठी ४०, सहाव्या स्तरासाठी ८०, सातव्या आणि आठव्या स्तरासाठी अनुक्रमे १२० आणि १६०, आठव्या स्तरासाठी अनुक्रमे १६० आणि ४०, नवव्या स्तरासाठी ८० आणि ४० श्रेयांक असतील. पहिल्या वर्षाची दोन सत्रे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवीपूर्व प्रमाणपत्र मिळेल. पदवीच्या दोन वर्षांची चार सत्रे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदविका प्रमाणपत्र देण्यात येईल. पदवीच्या तीन वर्षांची सहा सत्रे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाईल. एक वर्ष संशोधनासह चार वर्षांची आठ सत्रे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनर्स, पदवीनंतर दोन वर्षांची चार सत्रे पूर्ण करणाऱ्या पदव्युत्तर पदवी, पदवीनंतर दोन वर्षांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात पहिल्या वर्षाची दोन सत्रे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदविका, ऑनर्स अभ्यासक्रम पूर्ण करून एक वर्षाची दोन सत्रे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मास्टर्स पदवी दिली जाईल.

### श्रेयांक साठवणूक सात वर्षांसाठीच

उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सोडणे, अभ्यासक्रमात परतणे आणि पुनर्प्रवेशाची मुभा असेल. त्यासाठी विद्यार्थ्यांचे श्रेयांक ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये साठवले जातील. विद्यार्थ्यांच्या श्रेयांकानुसार त्यांना प्रमाणपत्र, पदविका, पदवी मिळेल. मात्र विद्यार्थ्यांनी मिळवलेले श्रेयांक त्यांच्या श्रेयांक खात्यात सात वर्षांसाठी साठवले जातील. अभ्यासक्रम सोडल्यानंतर सात वर्षांनंतर परतणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आधीच्या वर्षातील शैक्षणिक कामगिरीनुसार पुनर्प्रवेश शक्य होईल.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून पाच दिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामार्फत पाच दिवसीय ऑनलाईन प्राध्यापक विकास कार्यक्रमास मंगळवारपासून प्रारंभ होत आहे. एआयसीटीई ट्रेनिंग अँड लर्निंग अकादमीद्वारे प्रायोजित आहे. तंत्रज्ञान अधिविभागातील फूड टेक्नॉलॉजी विभागामार्फत १ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत कार्यक्रम होणार आहे.

अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान व संरक्षण या क्षेत्रामधील अद्ययावत संशोधन व विकास याविषयी देशातील नामवंत प्रोफेसर व संशोधक मार्गदर्शन करणार आहेत. पारंपरिक शेती व उद्योगात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शाश्वत नावीन्यपूर्ण उपक्रम कसे राबवले जातील याची माहिती व मार्गदर्शन होणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन तंत्रज्ञान अधिविभाग प्रमुख डॉ. आर. के. कामत, कार्यक्रम समन्वयक डॉ. आय. एस. उडचन, फूड विभाग समन्वयक डॉ. ए. के. साहू यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# आजपासून प्राध्यापक विकास कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामार्फत पाच दिवसीय ऑनलाईन प्राध्यापक विकास कार्यक्रमास मंगळवारपासून सुरुवात होत आहे. हा कार्यक्रम एआयसीटीई ट्रेनिंग अँड लर्निंग अकादमीद्वारे प्रायोजित असून, तंत्रज्ञान अधिविभागातील फूड टेक्नॉलॉजी विभागामार्फत दि. १ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान व संरक्षण या क्षेत्रामधील अद्ययावत संशोधन व विकास याविषयी देशातील नामवंत प्राध्यापक व संशोधक यांच्याकडून मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन कार्यक्रम समन्वयक डॉ. आय. एस. उडचान, फूड विभाग समन्वयक डॉ. ए. के. साहू, तंत्रज्ञान अधिविभाग प्रमुख डॉ. आर. के. कामत यांनी केले आहे.

सकाळ

# आजपासून ऑनलाईन परीक्षा

कोल्हापूर, ता. ३१ : कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे बंद झालेली शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये दोन मार्चपासून खुली होत आहेत. उद्यापासून (ता. १) परीक्षांना प्रारंभ होत असून, या परीक्षा ऑनलाईन होणार आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान या पारंपरिक शाखांसह व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांत ऑफलाईन शिक्षण दोन मार्चपासून दिले जाणार आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. आता कोरोनाची लाट ओसरत असल्याने राज्यातील महाविद्यालये पुन्हा सुरू केली जात आहेत. शिवाजी विद्यापीठांतर्गत संलग्न महाविद्यालये मात्र दोन मार्चपासून सुरू होणार आहेत. पहिले सत्र संपले असून, एक मार्चपर्यंत सुट्टी राहणार आहे. मात्र, उद्यापासून विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाईन घेतल्या जाणार आहेत.